REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# स्त्रि स्वातंत्र्याची चळवळ आणि भारतातील स्त्रि प्रमाण

**Mr. Satish Pandurangrao Patil**
**Dy.CEO Govt. of Maharashtra.**
**EX.Director - Dr.Ambedkar Competitive Examinition Centre (ACEC ) YASHADA, PUNE.**
**EX. Director -National Institute Of Post Harvesting Technology ( NIPHT ) PUNE.**
**Govt. Of Maharashtra.**



७ जुन १९८९ रोजी इंग्लंडमध्ये ब्लॅकवन येथे स्त्रियांची रिफॉर्म असोसिएशन स्थापन झाली. ''आम्हाला गुलाम म्हणून जगायचे नाही, पुरुषासारखे मरायचे आहे'' ही त्यांची घोषणा होती. बालविवाह, बहूपत्नीत्व हुंडापध्दती, केशवपन, सतीपध्दती, देवदासी, रखेलीपध्दती यासारख्या समस्यांनी स्त्री जीवन ग्रासले होते. स्त्रीयांची व्यथा कशी करुन त्यांना पुरुषा बरोबरीची जीवन जगता या त्यांचे स्वतंत्र अस्तित्व व जीवन मान्य केले जावे म्हणून स्त्री स्वातंत्र्याची चळचळ उभी राहिली.

१८६० मध्ये जॉन स्टुअर्ट मिल यांनी स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून मोहीम उघडली.१८७० मध्ये फॉस्टर एज्युकेशन ॲक्टव्दारे स्त्रियांना स्कुलबोर्डासाठी मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला. १९१८ साली वयामध्ये तफावत ठेवून पुरुषांना २१ व्या वर्षी तर स्त्रीयांना ३० व्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळाला. १९२८ मध्ये ही तफावत दूर झाली.

अमेरिकेतील स्त्री स्वातंत्र्याची चळवळ प्रभावशाली राहिली आहेः जुलै १८४८ मध्ये न्युयार्क येथे पहिली जागतिक परीषद संपन्न झाली. मानवी इतिहास हा पुरुषांनी स्त्रियांवर केलेला आघातांचा, अन्यायाचा व आक्रमणाचा इतिहास आहे, असे या परिषदेमध्ये स्पष्ट करण्यात आहे. १८६९–१८९६ या काळात वेगवेगळया घटक राज्याव्दारे स्त्रियांना मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आला.

८ मार्च १९०४ रोजी बूट व कपडे तयार करणा–या कारखान्यात दहा तासाचा दिवस करावा, समान वेतन मिळावे म्हणून संघटीत आंदोलन झाले. पोलीसाव्दारे हे आंदोलन चिरडण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. रोझा लक्झेम्बर्ग या मार्क्सवादी लेखिकेव्दारे ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन आयोजित करण्याची सूचना करण्यात आली आणि जगभर त्याला मान्यता मिळाली.

भारतातील स्त्री चळवळीला महत्वपूर्ण पार्श्वभूमी आहे. राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, महात्मा फुले, साहिवत्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले.

१९७४ मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठात भारतातील पहिले स्त्री अभ्यास केंद्र सुरु झाले. १९७५ ला विद्यापीठ अनुदान आयोगाने स्त्री अभ्यास शाखेला मान्यता दिली. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले.

फ्रेंच राज्यक्रांती, मानवी हक्काचा पुरस्कार, एकोणीसाव्या शतकातील उदारमतवादी चळवळी यामूळे स्त्री स्वातंत्र्याला पुरक वातावरण तयार झाले. आजपर्यंत स्वतःकडे पुरुषाच्या चष्म्यातून पहिले आता मात्र स्त्रिया स्वतःकडे स्वतःच्या चष्म्यातून पहात आहेत.


जहाल स्त्रीवादयांची भूमिका आक्रमक आहे. जैविक व मानसिक कारणामुळे नव्हे तर पुरुषप्रधन राभ्यतेच्या कल्पनेव्दारे आजच्या स्वरुपातील स्त्री नावाचा प्राणी तयार केला आहे. वर्तमानकाळात स्त्रीयांची सक्षमता वाढली आहे की केवळ साधनमूल्य वाढले आहे. हे तपासून पाहिल्यास पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला प्रजोत्पानदाबरोबरच अर्थोत्पादनाचे साधन म्हणून वापरण्याचे षडयंत्र रचले आहे हे लक्षात येते. स्त्रियावरील अत्याचाराचे भेदभावाचे मूळ पुरुषवर्चस्वात आहे. त्यामुळे ते झुगारुन लावल्याशिवाय खरे स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही. स्त्री स्वातंत्र्याची चळवळ शिक्षण आर्थिक स्वावलंबन, समान वेतन, समान काम इत्यादीपुरतीच मर्यादित न ठेवता घराघरातील सर्व प्रकारच्या पुरुष वर्चस्वाविरुध्द लढा उभा करावा लागेल. स्त्री पुरुष भेदभाव शारिरिक भिन्नतेमूळे नव्हे तर जगभरातील समाज व्यवस्थांनी जे अर्थ दिले किंवा मूल्ये चिटकवली त्यामुळे निर्माण झाले आहेत. लिंगभेदाचे रुपांतर सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात झाल्याने स्त्रीच्या शोषणाची व्यवस्था निर्माण होवू शकली. पती – पत्नीमधील नाते निखळ शोषणावर आधारित असल्यास तो प्रेमव्यवहार न ठरत शोषणव्यवहार ठरतो. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात जोपर्यंत पुरुषप्रधानता आहे तो पर्यन्त प्रेमाची भाषा अप्रस्तुत आहे. अपत्य संगोपन ही स्त्री पुरुषाची संयुक्त जबाबदारी आहे.

मार्क्सवाद्यांनी वर्गवर्चस्वाची जेवढी सखोल चिकीत्सा केली आहे तेवढी पुरुषसत्ता व्यवस्थेची केली नाही. नैतिकतेचे पुरुषधार्जिने निकष बदलावेत. विवाह करावा की करु नये याची स्त्रियांना स्वातंत्र्य हवे. स्त्री शरीराचे वस्तुकरण करणा–या सौदर्यस्पर्धा बंद कराव्यात, सौंदर्याची प्रतिक नाकारावीत. अशी भूतिका जहाल स्त्रीवादयांनी घेतली आहे.

अलीकडील काळात भारतीय समाजात स्त्रीयांचे प्रमाणे घटत आहे ही बाब गंभीर आहे. शतकानुशकते जगाच्या पाठीवर प्रत्येक समाजात स्त्री जीवनावर अन्याय होत आला आहे. निर्मिती, संवर्धन, पालनपोषण इत्यादीसाठी अपार कष्ट सहन करणारी स्त्री तिची संवेदनशिलता व माणूसपण सतत चिरडले जात आहे. स्त्रीचे आत्मबल, आत्मविश्वास आणि स्वावलंबन याचे खच्चीकरण होत असल्याने स्त्रियांशी संबंधीत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जगातील एकूण मालमत्तेपैकी स्त्रियांच्या नांवे केवळ एक टक्का मालमत्ता आहे. वर्तमानकाळात पैशाची ताकद ही व्यक्तीच्या वरचढपणाचा आधार ठरत आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्रीला पुरुषाबरोबरीचे अधिकार दिले असते तरी पारंपारिक व्यवस्था बळकट असल्यामुळे त्याची संपूर्ण अभिव्यक्ती होवू शकत नाही. भारतातील घटते स्त्री प्रमाण ही एक गंभीर महाभयंकर समस्या आहे. या देशात मुलगा जन्मास आल्यानंतर आनंद मानणारे आणि मुलगी झाल्याने दुःखर होणारे कोटयावधी लोक राहतात.

ज्या प्रदेशात महिलांची संख्या पुरुषापेक्षा अधिक असते ती प्रदेश सर्वार्थाने संपन्न असतो. काही देशात स्त्रियांची संख्या अधिक आढळते. उदा जर्मनी – १०७१, रशिया – १०७०, इंग्लंड – १०६०, अमेरिका – १०५०, कॅनडा – १०४९, जपान – १०४१, ब्राझील – १०२५, नायझेरिया – १०१६, इंडोनिशिया – १०४१. गेल्या शंहर वर्षाती भारतातील एक हजार पुरुषामागे स्त्री प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | : | स्त्री - पुरुष प्रमाणे |
|---|---|---|
| १९०१ | : | ९७१ |
| १९११ | : | ९६५ |
| १९२१ | : | ९५५ |
| १९३१ | : | ९५० |
| १९४१ | : | ९४५ |
| १९५१ | : | ९४६ |
| वर्ष | : | स्त्री - पुरुष प्रमाणे |
| १९६१ | : | ९४१ |
| १९७१ | : | ९३० |
| १९८१ | : | ९३४ |
| १९९१ | : | ९२७ |
| २००१ | : | ९३३ |




जवळ जवळ सर्वच विकसनशील देशात स्त्रियांची संख्या घटत आहे. गर्भजल परीक्षणामुळे नको असलेल्या भ्रुणहत्या करणे शक्य झाले आहे. स्त्री भ्रुणहत्येच्या वेगवान व विस्मण्यजनक वाढीमुळे मानवी जीवन ढवळून निघाले आहे. महाराष्ट्र शासनाने १९८८ मध्ये तर भारत सरकारने १९९६ मध्ये गर्भजल परीक्षण बंदी कायदा केला. कायदा करुनही गर्भजल परीक्षण व भ्रूणहत्या पूर्णपणे रोखता आली नाही. भ्रूणहत्येमुळे लहान वयोगटातील मुलींचे प्रमाण झपाटयाने घटत आहे.

हे मराठवाडयातील सात जिल्हयाच्या आकडेवारीवरुन स्पष्ट होते. मराठवाडयातील ० ते १ वयोगटातील मुला-मुलींची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| जिल्हा | मुले | मुली | एक हजार मुलामागे मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | २५६७४ | २२५६२ | ८७८.७९—५ |
| जलना | १९७४७ | १७२०४ | ८७१.२२—५ |
| परभणी | १४५४१ | १३५०६ | ९२८.८२ —२ |
| हिंगोली | ११८४३ | १०७२६ | ९०५.६८ —३ |
| नांदेड | २६२५८ | २५३८६ | ९३१.३२—१ |
| बीड | २५६९४ | २१६८१ | ८४३.८२—८ |
| लातूर | १९६९९ | १७५२९ | ८८९.८४—४ |
| उस्मानाबाद | १४५१९ | १२३१५ | ८४८.२०—७ |
| एकुण | १५८९७५ | १४०९०९ | ८८६.३६—७ |

मराठवाडयातील ० ते ६ वयोगटातील मुला-मुलांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | मुले | मुली | एक हजार मुलामागे मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १४१५०१ | १२९०३६ | ९११.९१—५ |
| जलना | १०९२१० | ९९३७६ | ९०९.९५—६ |
| परभणी | ९४६२६ | ७७८५४ | ९१९.९८—३ |
| हिंगोली | ६३९९७ | ६०५२९ | ९४५.८१—२ |
| नांदेड | १५९२१९ | १५१३०१ | ९५०.२७—१ |
| बीड | १४५७१५ | १२५८२० | ८६३.४७—८ |
| लातूर | १२२१३६ | ११२२६७ | ९१९.२०—४ |
| उस्मानाबाद | ८४५९२ | ७५७५३ | ८८६.०८—७ |
| **एकुण** | **९११८९६** | **८३१९३६** | **९१२.३१** |

भारतातील ० ते ६ वयोगटातील मुलींचे प्रमाणे १९९१ मध्ये ९४७ होते ते २००१ मध्ये ९२७ एवढे झाले आहे. एक हजार मुलामागे मुलींचे प्रमाण किमान ९५० असते हे प्रमाण आदर्श मानले जाते. राज्यानुसार स्त्री पुरुष प्रमाण पुढील प्रमाणे आहे.

| भारत/राज्य/ केंदशसित प्रदेश | दरहजार पुरुषामागे महिलांची संख्या २००१ | राज्य / केंद्रशासित प्रदेश | दरहजार पुरुषामागे महिलांची संख्या २००१ |
|---|---|---|---|
| भारत | ९३३ | पश्चिम बंगाल | ९३४ |
| जम्मु काश्मिर | ९०० | झारखंड | ९४१ |
| हिमाचल प्रदेश | ९७० | ओरिसा | ९७२ |
| पंजाब | ८७४ | छत्तीसगड | ९९० |
| चंदीगढ | ७७३ | मध्यप्रदेश | ९२० |
| उत्तरांचड | ९६४ | गुजरात | ९२१ |
| हरियाणा | ८६१ | दमण व दीव | ७०९ |
| दिल्ली | ८२१ | छादर नगर हवेली | ८११ |
| राजस्थान | ९२२ | महाराष्ट्र | ९२२ |
| उत्तर प्रदेश | ८९८ | आंध्र प्रदेश | ९७८ |
| बिहार | ९२१ | कर्नाटक | ९६४ |
| सिक्किम | ८७५ | गोवा | ९३३ |
| अरुणाचल प्रदेश | ९०१ | ल्क्षव्दीप | ९३४ |
| नागालॅण्ड | ९९९ | केरळ | १०५८ |
| मणिपूर | ९७८ | तामिळनाडू | ९८६ |
| मिझोरम | ९३८ | पॉण्डेचेरी | १००१ |
| त्रिपुरा | ९५० | अंदमान निकोबार | ८४६ |
| मेघालय | ९७५ | आसाम | ९३२ |

भारतात सर्वात जास्त प्रमाण केरळ राज्यात १०५८ दर सर्वात कमी प्रमाण चंदिगड केंद्रशासीत प्रदेशात ७७३ इतके आहे. भारताचा साक्षरता दर पुढील प्रमाणे आहे.

| वर्ष | साक्षरता | पुरुष | स्त्रीया |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ |
| १९६१ | २८.३० | ४०.४० | १४.२५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२९ |
| २००१ | ६५.३८ | ७५.८५ | ५४.१६ |

भारतातील ग्रामणी भागात ९३४ मुली तर शहरी भागात ९०३ मुली इतके प्रमाणे आहे. स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाणे ग्रमीण भागापेक्षा शहरी भागात तर अशिक्षितापेक्षा सुशिक्षितामध्ये अधिक आढळते.

रुढी, परंपरेचा प्रभाव व अंधश्रंध्दा, मुलगा हा वंशाचा दिवा, पुरुषी अहंकार, पुरुषप्राान संस्कृती व कुटुंबव्यवस्था स्त्रियांचे आर्थिक परावलंबन, हुंडा घेण्याची प्रथा, समाजजागृतीचा अभाव, स्त्रियावरील वाढते अत्याचार, बाळांतपणातील स्त्रीयांचा मृत्यू, अंधोरी खाजगी पध्दतीने होणारे गर्भभात इत्यादीमुळे स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. स्त्रीयांच्या घटत्या प्रमाणमूळे समाजावर भिन्न परिणाम होवू शकतील.

काही पुरुषांना अविवाहीत रहावे लागेल, बलात्कार, वेश्या व्यवसाय लैंगीक शोषण इत्यादीमध्ये वाढी होईल, कदाचीत बहुपतीत्वाची पध्दती अस्तित्वात येईल, कौटुंबिक जीवनावर विपरीत परीणाम होतील, समाजव्यवस्था अस्थिर बनेल, मनोविकृतीमध्ये वाढ होईल, अविवाहीत पुरुष गुप्तरोगाचे शिकार बनतील,

अविवाहीत पुरुषामध्ये जास्त काम करावे ही प्रेरणा राहणार नाही, त्यामुळे उत्पादनात घट होईल, विवाहपूर्व लैगिक संबंधाना मान्यता प्राप्त होईल, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल.

स्त्रियांचे प्रमाण वाढविण्यासाठी काही उपाय योजना येवू शकतील.

समाजजागृती, स्त्री शिक्षण व आर्थिक स्वावलंबन, भ्रुणहत्या बंदी कायदयाची कडक अमलबजावणी, या कायदयाचे उल्लंघन करणा-यांना कठोर शिक्षा, हुंडाविरोधी व बालविवाहविरोधी उपाय योजना, स्त्री पुरुष समानतेचे शिक्षण, स्त्रीयांना कर्तव्यदक्ष राहून अधिकाराचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, स्त्रियांना रोजगाराच्या, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे, स्त्री चळवळीस प्रोत्साहन देणे, संपत्तीत समान वाटा देणे, महिलांना सक्षम बनवण्याचे धोरण स्विकारणे व त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे इत्यादीमुळे स्त्रियांचे प्रमाणे निश्चित वाढू शकेल.